**धर्मादाय संघटनेतील धर्मादाय सह आयुक्त, गट-अ या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती व पदस्थापना करणेबाबत (निवडसूची सन २०२५-२६)**

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग,**
**शासन आदेश क्र:सीएचए-२०२६/प्र.क्र.३०/का.१ (ई-१६६२५६४)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक — २६ मे २०२६.

**<u>शासन आदेश</u>**

विधि व न्याय विभागाच्या अधिनस्त धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील धर्मादाय उप आयुक्त, गट-अ या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्यास खालील परिच्छेद क्र. २ मध्ये नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून सन २०२५-२६ च्या निवडसूचीमध्ये धर्मादाय सह आयुक्त, गट-अ (वेतनस्तर एस-२५ : ७८८००-२०९२००) या संवर्गातील नियमित पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना खालील तक्त्यात त्यांच्या नावासमोर स्तंभ-५ मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | नाव व व सध्याचे पद | प्रवर्ग | से.ज्ये.क्र. | पदोन्नतीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | डॉ. मनिष परशुराम पवार, धर्मादाय उप आयुक्त, सांगली | विजा(अ) | २ | धर्मादाय सह आयुक्त, नाशिक |

२. सदर पदोन्नती खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:

(१) मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील निर्णयास अधीन राहून सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे.

(२) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी पदोन्नत अधिकाऱ्यांना नियमितपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने सदर पदोन्नती/निवडसूची नियमित केल्यानंतर पदोन्नतीच्या पदावर सेवाजेष्ठता व अन्य सेवाविषयक लाभ मिळण्यास पदोन्नत अधिकारी पात्र ठरतील.

(३) उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांनी पदोन्नती नाकारल्यास पदोन्नतीसंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल, याची दक्षता संबंधित अधिकाऱ्याने घ्यावी.

३. पदोन्नत अधिकाऱ्याने सदर आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत पदोन्नतीच्या पदावर रुजू होणे आवश्यक राहील. धर्मादाय आयुक्त कार्यालयाने संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२६०५२६१३२३२६६११२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJIT DEVIDAS BORKAR

Digitally signed by SUJIT DEVIDAS BORKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department,
2.5.4.20=5A2DA98647916B7E9855A22ECA1DDE333B089C86282054EEACBD978B2B81A017, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7704308B7FF87C4C3453297E5225CAF5D9849C4CFFB77ACCF2B2FE315202A47B, cn=SUJIT DEVIDAS BORKAR
Date: 2026.05.26 13:24:23 +05'30'

**(सुजित बोरकर)**
**सहायक सॉलिसिटर-नि-उप सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. धर्मादाय सह आयुक्त, कोल्हापूर/ नाशिक
५. लेखा संचालक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, मुंबई
६. संबंधित अधिकारी (धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत)
७. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सांगली/कोल्हापूर/नाशिक
८. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-आस्थामं(१३)
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर
१०. निवड नस्ती(का.१)/ वैयक्तिक नस्ती.